Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II

Impact Factor / Indexing
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | मार्क्सवादी दृष्टीकोन स्वरुप, वैशिष्ट्ये, सामर्थ्य आणि मर्यादा<br>**डॉ. प्रा. रामकृष्ण ज्योतिबा प्रधान** | ६७-७१ |
| १५ | ग्रामीण साहित्यसमीक्षा : काही निरीक्षणे<br>**शंकररान्न प्रभाकर माने** | ७२-७६ |
| १६ | स्त्रीवाद व स्त्रीवादी कविता<br>**प्रा. डॉ. सदाशिव सरकटे** | ७७-८१ |
| १७ | समीक्षा : संकल्पना, स्वरुप आणि समीक्षेपुढील आव्हाने<br>**प्रा. मधुकर जाधव** | ८२-८४ |
| १८ | सौंदर्यवादी साहित्य समीक्षा<br>**प्रा. भैय्या डी. पाटील** | ८५-९१ |
| १९ | आदिबंधात्मक समीक्षेचे कार्य स्वरुप<br>**डॉ. एम. ए. कव्हळे** | ९२-९६ |
| २० | आदिबंध : संकल्पना<br>**डॉ. रेखा जगनाळे** | ९७-९८ |
| २१ | समीक्षा, संकल्पना आणि स्वरूप<br>**सोनवणे आण्णासाहेब हंबीराव**<br>**कदम पुजा शिवाजी** | ९९-१०१ |
| २२ | १९९० नंतरच्या ग्रामीण साहित्यातील जातीयतेचे बदलते स्वरूप<br>**डॉ. लहुकुमार खंडाळे** | १०२-१०५ |
| २३ | समीक्षा : संकल्पना आणि स्वरुप<br>**भाग्यश्री माताडे** | १०६-१०९ |
| २४ | समीक्षा, संकल्पना आणि स्वरुप<br>**भालेराव राजनंदीनी कैलास** | ११०-११५ |
| २५ | दलित साहित्य समीक्षा<br>**डॉ. सुधाकर पंडितराव बोथीकर** | ११६-११९ |

# १९. आदिबंधात्मक समीक्षेचे कार्य स्वरुप

डॉ. एम. ए. कव्हळे
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव.

साहित्य ही जीवनामधील महत्त्वाची कला आहे. मानवी जीवनामधील अत्यावश्यक व्यापार म्हणून कला व्यापाराकडे पाहिले जाते. या साहित्य व्यवहारामध्ये साहित्य समीक्षेचे स्थान अनन्यसाधारण आहे. एखाद्या कलाकृतीचे आकलन, आस्वादन आणि मूल्यमापन ही साहित्यसमीक्षेची उद्दिष्टये असतात. कलाकृतीकडे कोणताही पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन न ठेवता समत्व दृष्टीने पाहणे आणि त्याचे मूल्यमापन करणे साहित्य समीक्षेचे कार्य असते.

साहित्य ही मानवी मनाची निर्मिती असते. त्यामुळे साहित्याची समीक्षा म्हणजे केवळ साहित्यकृतीतील शब्द आणि अर्थांचे मूल्यांकन नसते. तर लेखकाचे व्यक्तित्व, देशकालपरिस्थिती, संस्कृती, त्याचे जीवनचरित्र, मानवी वृत्ती, वाङ्मयीन संस्कृती आणि परंपरा यांचा प्रभाव त्याच्या कलाकृतीवर पडत असतो. या सर्वांचा विचार करुन साहित्यकृतीची चिकित्सा करणे गरजेचे असते. कलाकृतीचे मूल्यमापन करतांना विविध अंगानी ते केले जाऊ शकते. साहित्य कृतीकडे पाहण्याचा विविध दृष्टिकोनामुळे आणि तिचे मूल्यमापन करण्याच्या विविध पद्धतीमुळे साहित्य समीक्षेच्या विविध पद्धती अस्तित्वात आल्या आहेत. यामध्ये चरित्रात्मक समीक्षा, ऐतिहासिक समीक्षा, मानसशास्त्रीय समीक्षा, समाजशास्त्रीय समीक्षा, मार्क्सवादी समीक्षा, आस्वादक समीक्षा, सौंदर्यशास्त्रीय समीक्षा, शैलीशास्त्रीय समीक्षा, संरचनावादी समीक्षा, विरचनावादी समीक्षा आणि आदिबंधात्मक समीक्षा या महत्त्वपूर्ण समीक्षापद्धती आहेत. या समीक्षा पद्धती साहित्यकृतीचे वेगवेगळया अंगांनी मूल्यमापन करतात. या सर्व पद्धतींनी साहित्य समीक्षेचे दालन समद्ध केले आहे.

साहित्यकृतीचे मूल्यमापन करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या समीक्षेपैकी आदिबंधात्मक समीक्षा पद्धती ही महत्त्वपूर्ण पद्धत आहे. गेल्या चार दशकापासून मराठी समीक्षेमध्ये आदिबंधात्मक समीक्षा पद्धती आपले स्थान बळकट करू पाहत आहे. गंगाधर पाटील यांनी या समीक्षा पद्धतीची ओळख सर्व प्रथम मराठी समीक्षाक्षेत्राला करून दिली. आदिबंधात्मक समीक्षा पद्धती गेल्या चार दशकामध्ये मराठी समीक्षाक्षेत्रात आली असली तरी या समीक्षा पद्धतीचे मूळ स्वीस अभ्यासक कार्ल गुस्ताव युंग याने मांडलेल्या आदिबंधाच्या संकल्पनेमध्ये आहे. कार्ल गुस्ताव युंग हा स्वीस अभ्यासक सिग्मंड फ्राईडचा शिष्य आणि सहकारी होता. मानसशास्त्राचा अभ्यास करताना फ्राईडने लैंगिकतेला दिलेले अवास्तव महत्त्व कार्ल युंगला मान्य नसल्याने त्याने स्वतःचे स्वतंत्र संशोधने केले. या संशोधनांती त्याने सामूहिक नेणिवेचा विचार मांडला. हा विचार आदिबंधनिष्ठ समीक्षेचा पायाभूत विचार होय. कार्ल युंगने मानवी मनाची जाणीव, वैयक्तीक नेणीव आणि सामूहिक नेणीव असे तीन स्तर कल्पून सामूहिक नेणिवेमध्ये आदिबंधाचे साचे असतात असे सांगितले. मानवी जीवनाचा इतिहास सामूहिक नेणिवेत असतो आणि मानव त्याचा त्यात मुशीत जीवनातील अनुभव घेत असतो. साहित्यामध्ये आदिबंध प्रतिमा प्रतीकांच्या रुपात आविष्कृत होतात. त्यामूळे कलाकृतीही लेखकांच्या सामूहिक नेणिवेतील आदिबंधात्मक निर्मिती असते असे त्याने स्पष्ट केले.

आदिबंधाचे स्वरूप स्पष्ट करताना कार्ल युंग म्हणतो, "अशा कलाकृती सामूहिक अचेतनातून उदित होतात. मनाचा हा स्तर म्हणजे लाखो वर्षावर साठत गेलेल्या मानवी अनुभवाचा प्रचंड खजिना होय. तो इतिहासपूर्व घटनांचा प्रतिध्वनी होय. त्यात एकेका शतकाने घातलेली भर अगदी नगण्य असते. त्यामुळे त्यात फारसा बदल होतो वा वेगळेपणा येतो असे नाही. शेवटी हा मानवी मेंदूत व सहानुकंपनशील मज्जासंस्थेत सुप्त असलेला विश्वप्रक्रियांचा ठेवा असतो. ती एक कालातीत वा चिरंतन अशी विश्वप्रतिमा असते आणि ती आपल्या जाणिवेतील क्षणिक जगच्चित्राला तोलून धरते. या विश्वप्रतिमेचे स्वरूप आरशातल्या प्रतिबिंबासारखे असते. पण या प्रतिबिंबात नसलेली शक्ती नेणिवेतील विश्वप्रतिमेत असते. ती आपणावर आतूनच प्रभाव गाजवते."[1] कार्ल युंगच्या या आदिबंध संकल्पनेचा आधार घेत अनेक पाश्चात्य विचारवंतांनी त्याचा अभ्यास केला. त्यातून आदिबंधात्मक साहित्य समीक्षा ही पद्धती विकसित झाली.

आदिबंधात्मक समीक्षा मराठी साहित्य समीक्षेच्या प्रांतात नवीन असली तरी गेल्या चार दशकांपासून मराठी समीक्षकांनी या समीक्षा पद्धतीचे उपयोजन करण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये गंगाधर पाटील अग्रभागी असून डॉ.म.सु.पाटील, अरूणा ढेरे, रोहिणी तुकदेव यांचे कार्य महत्त्वाचे आहे. या समीक्षकांनी आपल्या समीक्षणात्मक लेखनातून आदिबंधात्मक समीक्षेचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**गंगाधर पाटील**

आदिबंधात्मक समीक्षेविषयी विवेचन करताना गंगाधर पाटील म्हणतात, "आदिबंधनिष्ठ समीक्षेचा मूलभूत सिद्धांत असा आहे : काव्य ही एक प्रतीकरूप भाषा (सिम्बॉलिक लॅंगवेज) असून ती मिथ, स्वप्न व लोककथा यांच्याप्रमाणेच मानवी मनातील आदिम व सर्वस्पर्शी भावविश्वाचा आविष्कार करत असते. आणि त्यामुळेच ती जणू साऱ्या मानवजातीची एक सार्वकालीन, सर्वस्पर्शी व स्वभाविक भाषा बनली आहे. म्हणून काव्याचे आकलन हे मानवी प्रतीकसृष्टी, काव्यसृष्टी, तीमधील संकेत व परंपरा यांच्या संदर्भात करून घेणे आवश्यक असते. अशी आदिबंधनिष्ठ समीक्षेची व्यापक भूमिका आहे. तसेच साहित्यकृती ही समग्र साहित्यसृष्टीचे एक अंग आहे; आणि पुन्हा साहित्यसृष्टी ही विशिष्ट संस्कृतीचे एक अंग असते, असे मानून समीक्षकाने साहित्यकृतीचे सौंदर्यग्रहण व मूल्यमापन केले पाहिजे, अशी आदिबंधनिष्ठ समीक्षेची साहित्यकृतीकडे पाहण्याची दृष्टी आहे."[2]

गंगाधर पाटलांचे वरील विधान आदिबंधात्मक समीक्षेचे स्वरूप व महत्त्व विशद करणारे आहे.

**डॉ. म. सु. पाटील**

मराठीमध्ये आदिबंधात्मक समीक्षेच्या उपयोजनाचे महत्त्वपूर्ण कार्य डॉ.म.सु.पाटील यांनी केले आहे. मराठीमध्ये आदिबंधात्मक समीक्षेचा विचार करताना त्यांच्या विवेचनाला वगळून पुढे जाणे शक्य नाही. आदिबंधात्मक समीक्षेच्या स्वरूपाबद्दल ते लिहितात, "ही समीक्षा केवळ आशयवादी नाही वा केवळ आकृतिवादीही नाही. ती दोन्हींचाही विचार करण्याइतकी सर्वसमावेशक आहे. तो करताना तिला या दोन गोष्टींचा वेगवेगळा विचार करावा लागत नाही. कलाकृतीमधील प्रतिमा प्रतीकांचा अन्वयार्थ विशद करताना ओघाओघात कलाकृतीचा आशय व तिची व्यामिश्रता जसजशी उलघडत जाते, त्याचबरोबर क्रमशः उदित होणाऱ्या प्रतिमा प्रतीकांच्या द्वारे कलाकृतीला प्राप्त होत जाणारे रूपही कसे सिद्ध होते ते दाखवता

येते. प्रतिमा प्रतीकांचा अन्वयार्थ लावताना त्यात निहित असलेले ताण, त्यांची भावसघनता व अवहकता यामुळे त्यांना प्राप्त होणारे सौदर्य जसे विशद करता येते, तसेच शब्दार्थाचे सहितत्त्व व वैशिष्ट्यत्व याचा म्हणजे शैलीगत सौदर्याचा विचार करता येतो."[3]

डॉ.म.सु. पाटलांच्या वरील विवेचनावरून आदिबंधात्मक समीक्षा ही कलाकृतीच्या आशय व अभिव्यक्ती या दोन्हींचा विचार करणारी आहे असे स्पष्ट होते. आदिबंधात्मक समीक्षापद्धतीच्या मूल्यमापनाच्या पद्धतीविषयी म.सु.पाटील म्हणतात, "अशा कलाकृतीचे आकलन करताना ज्याप्रमाणे त्यांमधील प्रतिमा प्रतीकांवर लक्ष केंद्रीत करावे लागते, त्याचप्रमाणे त्यांचे मूल्यमापन करतानाही तोच मार्ग अनुसरावा लागतो. ही निर्मिती प्रतीकात्मक आहे की नाही यावरून जशी तिची कलात्मकता ठरते त्याचप्रमाणे त्या प्रतिमा प्रतीकांतून व्यक्त होणारी बहूवर्थता आणि त्यांची आवाहकता यांच्या आधारे तिचे चांगलेपण वा श्रेष्ठत्व विशद करता येते."[४]

**रोहिणी तुकदेव**

आदिबंधात्मक समीक्षेच्या जबाबदारीविषयी रोहिणी तुकदेव म्हणतात, "साहित्यकृतीतील प्रतिमा प्रतीकांच्या आधारे तिच्या अर्थाचे आकलन करणे, वस्तूनिष्ठपणे साहित्यकृतीचे तिच्या साहित्यप्रकाराच्या परंपरेत तिचे स्थान निश्चित करणे, त्या साहित्यपरंपरेचा समावेशक संदर्भ शोधणे अशी सर्व जबाबदारी या समीक्षेवर असते."[५]

**डॉ.अरूणा ढेरे**

"साहित्याच्या बाहयरूपाशी नव्हे, तर अंतर्विश्वाशी या समीक्षेचा संबंध आहे, साहित्याच्या निर्माणक संकल्पनेशी आहे. साहित्याचा एक मुळ गुणधर्म असा की, अंतर्निहीत चेतनेला प्रेरित करणे. ही शक्ती आपल्यामध्ये आदिबंधाची बीजे वागविते. साहित्याच्या याच प्रारंभशक्तीचा शोध आदिबंधात्मक समीक्षा घेते."[६] हे अरूणा ढेरेंचे विधान आदिबंधात्मक समीक्षेच्या सखोलतेचे महत्त्व विशद करते.

वरील सर्व अभ्यासकांच्या विवेचनाचा विचार केल्यानंतर आदिबंधात्मक समीक्षेचे स्वरूप स्पष्ट होते तसेच या समीक्षेचे कार्यस्वरूप स्पष्ट करता येते. आदिबंधात्मक समीक्षेला प्रतिष्ठा आणि मराठी समीक्षाक्षेत्रात स्वतंत्र स्थान मिळवून देण्यामध्ये या सर्व अभ्यासकांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे.

**आदिबंधात्मक समीक्षेचे कार्य स्वरुप**

आदिबंधात्मक समीक्षेविषयी समीक्षीकांच्या मतांचे विवेचन केल्यानंतर आदिबंधात्मक समीक्षेचे कार्य स्वरुप स्पष्ट करणे शक्य आहे. आदिबंधात्मक समीक्षा पद्धती साहित्याचा अभ्यास करणाऱ्या इतर पद्धतीप्रमाणेच वैशिष्टयपूर्ण असून साहित्याच्या चिकित्सेतून नवा अर्थबोध देण्याचे सामर्थ्य तिच्यामध्ये आहे. सर्वच कलाकृतींना ही समीक्षा लागू करता येत नसली तर आदिबंधात्मक साहित्यकृतीची चिकित्सा या समीक्षा पद्धती शिवाय होऊ शकत नाही. त्यामुळे तिच्या मर्यादेमध्ये तिचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आदिबंधात्मक समीक्षा कशा पद्धतीने साहित्यकृतीची चिकित्सा करते तिचे कार्य स्वरुप कशा प्रकारचे आहे ? याचा विचार प्रस्तुत मुद्याच्या आधारे करता येईल.

१. आदिबंधाने धारण केलेल्या विविध आकाराचा अभ्यास ही पद्धती करते. ते आकार मानवी मनाच्या सामूहिक अचेतनामध्ये असतात. या आदिबंधाच्या साच्यांचे स्वरुप अमूर्त असते. त्याचे आदिप्रतिमा हे मूर्त स्वरुप साहित्यकृतीत आविष्कृत होते. त्या आधारे आदिबंधांनी धारण केलेल्या विविध आकारांचा शोध घेण्याचे कार्य ही समीक्षा करते.

२. आदिबंधात्मक कलाकृतीची चिकित्सा आदिबंधात्मक समीक्षा करते. त्यामूळे आदिबंधात्मक आशय व्यक्त करण्याऱ्या साहित्यकृतीची समीक्षा करताना आपणास त्या साहित्यकृतीतील प्रतिमा प्रतीकावर प्रथम लक्ष केंद्रित करावे लागते.

३. आदिबंधात्मक आशय व्यक्त करणाऱ्या साहित्यकृतीतील प्रतीक प्रतिमांचा शोध घेतल्यानंतर त्या प्रतिमा प्रतीकांचा अन्वयार्थ लावावा लागतो. त्यासाठी संस्कृतीतील त्या प्रतीकांचे संदर्भ समीक्षकाला जाणून घेणे अत्यावश्यक आहे.

४. कलाकृतीतील प्रतिमा प्रतीकांचा अन्वयार्थ लावल्यानंतर त्या प्रतीकांमधून कोणता आदिबंध आविष्कृत झाला आहे हे दाखवावे लागते.

५. साहित्यकृतीतील प्रतिमा प्रतीके यांचे जीवनातील संदर्भ कोणते, ही प्रतीके उत्स्फूर्तपणे आली आहेत का ? की त्यामध्ये हिशोबीपणा आहे याचाही शोध या पद्धतीमध्ये घेणे आवश्यक आहे.

६. साहित्यकृतीच्या प्रतीकात्मक निर्मितीवरुन तिची कलात्मकता ठरवणे हे कार्य आदिबंधात्मक समीक्षा करते.

७. साहित्यकृतीच्या निर्मात्याने वापरलेल्या प्राक्कथांच्या योजनेतील उपयूक्तता तपासणे.

८. साहित्यकृतीमध्ये विवक्षित सांस्कृतिक पर्यावरण भरलेले असते या सांस्कृतिक पर्यावरणाचा मूलवंश शोधण्याचे, या पर्यावरणाशी असलेले आदिबंधाचे नाते न्याहाळण्याचे आणि या आदिबंधाच्या पुनरावृतीचे स्वरुप कार्य तपासण्याचे कार्य या समीक्षेला करावे लागते.

९. एका बाजूने कलाकृतीच्या सर्व अंगांची त्याच्या संदर्भात जोडणी करणे व दुसऱ्या बाजूने त्याच्या आधारे आदिबंधाच्या माध्यमातून संपूर्ण कलाकृतीत साकारलेल्या आदिम प्रवृतीचा शोध घेणे ही दोन कामे आदिबंधात्मक समीक्षा करते.

१०. सृष्टीबरोबर मानवी चेतनांचा भावसंबंध प्रस्थापित करणे हा साहित्याचा एक मुळ हेतु आहे. आदिबंधाच्या आधारे मानव आणि सृष्टी यामधल्या अनंत काळापासूनच्या भावसंबंधाचे विश्लेषण करुन आदिबंधात्मक समीक्षा साहित्याच्या मूळ रुपाचे गुण विशेष शोधू पाहते.

११. ही समीक्षा प्रथम साहित्यकृतीच्या मुळाशी असणाऱ्या आदिबंधाचा शोध घेते आणि कलाकृतीच्या विविध अंगात त्यांचे कसे आविष्करण झाले आहे किंवा तो त्यातून कसा पुष्ट झाला आहे हे सांगते.

१२. प्रतिमा प्रतीकांची बहूवर्थता आणि आवाहकता यावरुन साहित्यकृतीचे मूल्यमापन केले जाते.

१३. साहित्यकृतीच्या निर्मात्याची नवप्राक्कथा निर्मितीची क्षमता जोखण्याचे कार्य ही समीक्षा पद्धती करते.

१४. साहित्यकृतीत प्रतीत होणाऱ्या प्रतीकांतून वर्तमान जीवनातील कोणते विसंवाद समन्वीत केले गेले आहेत याचा परमर्श घेणे या समीक्षेत्रात बंधनकारक आहे.

१५. साहित्य अंतर्निहीत चेतनेला प्रेरीत करते. ती शक्ती आपल्यामध्ये आदिबंधाची बीजे वागवीते. साहित्याच्या याच प्रारंभ शक्तीचा शोध आदिबंधात्मक समीक्षा घेते.

१६. आदिबंधात्मक समीक्षा ही विवेचक, आस्वादक पद्धती असून आदिबंधाला केंद्र करुन ही समीक्षा त्याच्या आधारे संपूर्ण कलाकृतीच्या संरचनेचा उलगडा करीत जाते.

१७. आदिबंधात्मक समीक्षा साहित्यकृतीचे तिच्या साहित्य प्रकाराच्या परंपरेत स्थान निश्चित करते.

१८. साहित्यकृतीतून संज्ञा विकासाचा शोध घेणे या समीक्षेमध्ये महत्त्वाचे मानले जाते.

१९. साहित्य कृती ज्या सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीत घडली तिचा अंतर्वेध आदिबंधात्मक समीक्षा घेते.

२०. ही समीक्षा केवळ आशयवादी किंवा आकृतिवादी नसून ती दोन्हीचा विचार करण्याइतकी सर्वसमावेशक आहे.

२१. आदिबंधाच्या प्रकाशात साहित्यकृतीचा घाट, भाषा, व्यक्तीरेखा, प्रतिमा प्रतीके यांचा विचार ही समीक्षा करते.

२२. ही समीक्षा साहित्य ज्या संस्कृतीचा भाग आहे त्या संस्कृतीतील अतिशय अर्थपूर्ण आणि मानव जातीला आवाहन करणारे आकृतीबंध साहित्यातून कसे आविष्कृत झाले ते दाखवून देते.

२३. मानवी जीवनाच्या दृष्टीने कलाकृतीची मूल्यात्मकता ही समीक्षा विशद करते.

**संदर्भ**

१. C.G.Jung, The Collected Works, Vol. Eight, p.३७६

२. गंगाधर पाटील, समीक्षेची नवी रूपे, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, पहिली आवृत्ती जानेवारी १९८१, पृष्ठ. ७३

3. डॉ.म.सु.पाटील, आदिबंधात्मक समीक्षा, नीहारा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती सप्टेंबर, १९८९ पृष्ठ. ८५

4. तत्रैव, पृष्ठ. ८७

5. रोहिणी तुकदेव, आदिबंधात्मक समीक्षा, साठोत्तरी मराठी समीक्षा (संपा.), केशव साठे, पणजी, १९९६, पृष्ठ.

6. अरूणा ढेरे, काळोखाचे कवडसे, सुरेश एजन्सी, पुणे, नोव्हेंबर १९८७, पृष्ठ. १७४